# मानवी हक्काच्या संदर्भात समकालीन इच्छामरणाचा अधिकार

**डॉ. संदीप बी. काळे**

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

यशवंत महाविद्यालय, सेलू जि. वर्धा

**सारांश (Abstract) :**

जागतिक पटलावर समकालीन परिस्थितीत इच्छामरणाचा अधिकार अतिशय प्रासंगिक मुद्दा आहे. इच्छामरणाचा अधिकार असावा की नसावा यासंदर्भात मानवी हक्काच्या दृष्टिकोनातून सातत्याने चर्चा होत आहे. भारतात सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय, केंद्रीय निधी आयोगाची शिफारस आणि विविध सामाजिक संघटनांकडून इच्छामरणास दाखविलेली अनुमती आणि त्यामध्ये अरुणा शानबाग यांचा झालेला मृत्यू यामुळे यासंदर्भात कायदा करण्याची आवश्यकता असल्याचे मत तयार झाले आहे. "स्वत:च्या इच्छेने मृत्यूला सामोरे जाणे म्हणजे इच्छामरण होय" किंवा "विकलांग अथवा आजारी व्यक्तींच्या विनंतीवरुन डॉक्टरांनी व्यक्तीचे जीवन औषधाने वेदना न होता संपविणे" सर्वोच्च न्यायालयाच्या पाच सदस्यीय खंडपीठाने 9 मार्च 2018 रोजी इच्छामरणास परवानगी देण्याचा ऐतिहासिक निर्णय दिला.

मानवी हक्काच्या संदर्भात विचार करता इच्छामरण ही व्यक्तीच्या जीवनासंदर्भातील अत्यंत महत्त्वपूर्ण बाब आहे, परंतु ती एक गुंतागुंतीची संकल्पना राहिली आहे. तिला कायद्याच्या चौकटीत बसविणे अवघड आहे. कारण या संकल्पनेला कायद्याच्या संदर्भात विश्लेषित करताना कायदा व नैतिकता असे दोन प्रवाहरुपी प्रश्न निर्माण होतात. सर्वोच्च न्यायालयाने इच्छामरण आणि आत्महत्या यांच्यामधील फरक सुध्दा स्पष्ट केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने कायद्याची विश्वसनीयता व कायद्याची संवैधानिकता यामधील फरक विशद करुन कलम-306 संवैधानिक ठरविले. या निर्णयामुळे इच्छामरणाची संकल्पना कायद्याच्या चौकटीत बसविण्यास सुरुवात झाली. जीवनाच्या अधिकारात मरणाचा अधिकार समाविष्ट होत नसून प्रतिष्ठेने मरण्याचा अधिकार समाविष्ट होतो. प्रतिष्ठेसह मरणे म्हणजे अनैसर्गिक मृत्यू नव्हे, जेव्हा व्यक्ती एखाद्या दुर्धर आजाराने ग्रस्त आहे, तिचे मरण अटळ आहे तेव्हा इच्छामरणाचा अधिकार देणे योग्य आहे. परंतु ॲक्टीव्ह युथेन्सीयाच्या तुलनेत पॅसीव्ह युथेन्सीया ला मान्यता देणे नैतिकदृष्ट्या योग्य की अयोग्य हा देखील महत्त्वाचा मुद्दा आहे. सर्वोच्च न्यायालयाने 9 मार्च 2018 रोजीच्या निर्णयाद्वारे इच्छामरण अधिकारास सशर्त परवानगी दिल्याचे स्वागत करावयास हवे. कारण मानवी हक्काच्या

योग्य उपलब्धीकरिता व्यक्तीला प्राप्त झालेला इच्छामरणाचा अधिकार अतिशय सकारात्मक असणार आहे.

**बीज संज्ञा (Key-words) :**

मानवी हक्क (Human Rights), जीवन जगण्याचा अधिकार (Right to life), इच्छामरण (Euthansia).

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of Research paper) :**

1. समकालीन इच्छामरणाची संकल्पना स्पष्ट करणे.
2. मानवी हक्काच्या संदर्भात इच्छामरणाच्या अधिकाराचे विश्लेषण करणे.
3. इच्छामरणाची समर्थनार्थ आणि असमर्थनार्थ बाजू विशद करणे.

**प्रस्तावना** (Introduction) :

समकालीन परिस्थितीत इच्छामरणाचा मानवी हक्काच्या संदर्भात भारतातच नाही तर संपूर्ण जागतिक पटळीवर चर्चेचा विषय ठरत आहे. परंतु याविषयी नेहमी दोन मतप्रवाह आपल्या प्रबळ मुद्याला धरुन राहिल्यामुळे हा विषय केवळ चर्चेचा विषय ठरला आहे. मात्र असे असले तरी जागतिक स्तरावर इच्छामरणाविषयी कायदे करण्यास यश आले आहे. उदा. नेदरलँड, बेल्जिअम, स्विझर्लंड, ऑस्ट्रेलिया, अमेरिकेतील काही राज्ये. पण या विषयाचा भारताच्या दृष्टिकोनातून विचार केला तर हा विषय फक्त चर्चेचा विषय ठरला आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय केंद्रीय विधी आयोगाची शिफारस आणि विविध सामाजिक संघटनांकडून इच्छामरणास दर्शविलेली अनुमती आणि त्यात अरुणा शानबाग यांचा झालेला मृत्यू यामुळे यावर कायदा करण्याची आवश्यकता असल्याचे मत तयार झाले आहे. त्यामुळे इच्छामरणासंदर्भात कायदा करण्यासंबंधी विचार होऊ लागला आहे. बदलत्या काळानुसार कायद्यात सुध्दा बदल करणे आवश्यक असल्याचा मतप्रवाह निर्माण होत आहे. मात्र असे नाही की यास विरोध होत नाही. कारण मुख्यत: भारतीय समाज भावनिक संबंधाने एकमेकांशी जोडला गेलेला आहे. त्यामुळेच अरुणा शानबागला मृत्यू देणाच्या याचिकेला नर्स व डॉक्टरांनी विरोध केला, त्यामुळे ती याचिका न्यायलयाने फेटाळली. त्यामुळे सध्या जरी इच्छामरणाविषयी कायदा असला पाहिजे असे म्हटले जात असले तरी तो कायदा करणे सहज शक्य होणार नाही. मात्र ज्या-ज्या वेळी इच्छामरणाच्या अधिकाराचा विषय चर्चिला जाईल, त्या-त्यावेळी अरुणा शानबागचा संदर्भ जोडला

हे मात्र निश्चित आहे. अरुणा शानबाग 1966 मध्ये मुंबई येथील के. ई. एम. (किंग एडवर्ड मेमोरिअल) हॉस्पीटलमध्ये नर्स म्हणून रुजू झाल्या होत्या. याच हॉस्पीटलमध्ये 27 नोव्हेंबर 1973 रोजी त्यांची ड्युटी संपल्यानंतर कपडे बदलण्यासाठी तळघरात गेल्या असताना सोहनलाल वाल्मिकी या व्यक्तीने त्यांच्यावर हल्ला केला. तेव्हा त्याने त्यांच्यावर बळजबरी करताना त्यांचा लोखंडी साखळीने गळा आवळला. मेंदूला ऑक्सीजन पुरवठा कमी झाल्याने त्यांची दृष्टी नाहिशी झाली. या हल्ल्यात त्यांना शारीरिक इजा सुध्दा मोठ्या प्रमाणात झाली होती. त्यामुळे अरुणा शानबाग कोमाच्या अवस्थेत गेल्या होत्या. त्यांच्यावर अत्याचार करणारा सोहनलाल वाल्मिकी याच रुग्णालयात वार्डबॉय म्हणून काम करत होता. त्यानंतर त्याला चोरीचा आणि हत्येचा प्रयत्न करण्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती. त्यामुळे त्याला केवळ सात वर्षाच्या कारावासाची शिक्षा झाली. त्यावेळी कायद्याची योग्य माहिती नसल्यामुळे सोहनलालवर योग्य ते आरोप अरुणाचे नातलग व त्यांचे सहकारी लावू शकले नव्हते. त्याचवेळी अरुणा यांचा विवाह एका डॉक्टरशी ठरला असल्यामुळे त्यांनी बदनामीच्या भीतीपोटी बलात्काराच्या आरोप सोहनलालवर लावला नसावा. यामुळे आरोपी सोहनलाल वाल्मिकीला केवळ सात वर्षाची शिक्षा झाली तर निरपराध अरुणा यांना मृत्यूशी झुंज देत एकप्रकारे मृत अवस्थेत जवळपास 42 वर्षे काढावी लागली आणि 18 मे 2015 रोजी मुंबई येथील के. ई. एम हॉस्पीटलमध्ये निधन झाले. या प्रकरणामुळे भारतात इच्छामरणाचा प्रश्न न्यायिक, राजकीय आणि सामाजिक स्तरावर चर्चिला जात आहे.

कॉमनकॉज या स्वयंसेवी संस्थेकडून 2005 मध्ये प्रतिष्ठेने मरण स्वीकारण्याच्या अधिकारासाठी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली. केंद्रीय विधी आयोगाद्वारा 196 व्या अहवालात इच्छामरण कायदेशीर करण्याची शिफारस करण्यात आली. इच्छामरणाची वर्गवारी Active Euthanasia व Passive Euthanasia अशी करण्यात आली. Passive Euthanasia ला कायदेशीर करण्याची शिफारस करण्यात आली. यानुसार Medical Treatment to Treminally ill patients (Protection of Patients & Medical Practitioners) Act-2006 चा मसुदा केंद्रीय विधी आयोगाद्वारा निर्माण करण्यात आला. 2009 मध्ये पत्रकार पिंकी विराणी यांच्याद्वारा अरुणा शानबाग यांना इच्छामरण (दयामरण)

मिळावे या हेतूने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. या याचिकेस के. ई. एम हॉस्पीटलमधील डॉक्टर व परिचारिकांचा विरोध होता. 2011 मध्ये पिंकी विराणी यांनी दाखल केलेल्या याचिकेवर निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाकडून Passive Euthanasia यास परवानगी देण्यात आली, परंतु अरुणा शानबाग यांच्या दयामरणास परवानगी नाकारली. 2012 मधील विधी आयोगाच्या 241 व्या अहवालात इच्छामरण करण्याची शिफारस करण्यात आली. 18 मे 2015 रोजी अरुणा शानबाग यांचा मृत्यू झाला. तसेच 2016 मध्ये केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडून विधी आयोगाच्या अहवालावर आधारित Medical Treatment to Treminally ill patients (Protection of Patients & Medical Practitioners) विधेयकाचा मसुदा जाहीर करण्यात आला. अशाप्रकारची विविधांगी स्वरुपाची संक्रमणावस्था इच्छामरणाच्या अधिकार संदर्भात असलेली दिसते.

**मानवी हक्क आणि इच्छामरणाचा अधिकार :**

इच्छामरण अर्थात युथेन्शिया (Euthanasia) हा मूळचा ग्रीक शब्द आहे. याचा अर्थ Eu = चांगले, Thanatos = मृत्यू किंवा सुलभ मरण असा होतो. "स्वत:च्या इच्छेने मृत्यूला सामोरे जाणे म्हणजे इच्छामरण होय" किंवा "विकलांग अथवा आजारी व्यक्तींच्या विनंतीवरुन डॉक्टरांनी व्यक्तीचे जीवन औषधाने वेदना न होता संपविणे" युथेन्शियाची ॲक्टिव्ह युथेन्शिया (एखाद्या औषधामधून किंवा इंजेक्शनद्वारे रुग्णाचे जीवन संपविणे) आणि पॅसिव्ह युथेन्शिया अशा प्रकारात विभागणी केली जाते. ऍटिव्ह युथेन्शियास 'कृतीपूर्ण स्वेच्छामरण' व पॅसिव्ह युथेन्शियास "नैसर्गिक स्वेच्छामरण" असे सुध्दा म्हटले जाते. इच्छामरणाच्या विविध व्याख्या असून देशनिहाय त्याचे प्रकार देखील बदलतात. मानसिक स्थिती ठीक असणाऱ्या रुग्णाच्या विनंतीवरुन जेव्हा वैद्यकीय तज्ज्ञ औषधी देऊन जेव्हा रुग्णाचे आयुष्य संपवितात तेव्हा त्यास सक्रिय इच्छामरण असे म्हणतात. ही कृती जाणीवपूर्वक केली जाते, रुग्णाच्या परवानगीशिवाय वैद्यकीय तज्ज्ञ रुग्णाचे आयुष्य संपवितात. (अर्थात यामागे वैद्यकीय तज्ज्ञांचा कोणताही हेतू नसतो) अशाप्रकारचे इच्छामरण नेदरलॅंडमध्ये कायदेशीर आहे. रुग्णाच्या विनंतीवरुन आयुष्य संपविणारे औषध वैद्यकीय तज्ज्ञ रुग्णाला उपलब्ध करुन देतात (जर्मनीमध्ये कायदेशीर आहे) सर्वोच्च न्यायालयाने अरुणा शानबाग खटल्यात Active Euthansia ची व्याख्या "Entails the use of lethal

substances or forces to kill a person e. g. a lethal injection" अशी केली आहे. चालू खटल्याचा निकाला देताना सर्वोच्च न्यायालयाने "Active Euthansia" ची व्याख्या "A Positive act or affirmative action or act of commission entailing the use of lethal substances of forces to cause international death of person by direct intervention" अशी केली आहे. व्यक्तीला केवळ जीवंत ठेवणारी साहाय्यक वैद्यकीय यंत्रणा काढून ठेवणे या शब्दात सर्वोच्च न्यायालयाने Passive Euthansia ची व्याख्या केली आहे. म्हणजेच रुग्ण फक्त व्हेंटिलेटर, औषध वा वैद्यकीय तज्ज्ञांच्या देखरेखीतील अन्न यावरच अवलंबून असेल तर ते देणे बंद करणे असा अर्थ विशद केला आहे. 1981 मध्ये मुंबई स्थित सामाजिक कार्यकर्ते व राजकारणी मिनू मसानी यांनी Society of Right to Die with Dignity ही संस्था स्थापन केली. यासह इच्छामरणाबाबत चर्चा होण्यास सुरुवात झाली. सध्या या सोसायटीचे अंदाजे 500 सदस्य असून बहुतांश सदस्य मुंबईतील आहेत. तसेच 1984 मध्ये आमदार सदानंद वर्दे यांनी महाराष्ट्र विधीमंडळात इच्छामरणविषयक खाजगी विधेयक मांडले. हे विधेयक बहुमताअभावी मंजुर होऊ शकले नाही. 2002 मध्ये इच्छामरण व Assisted Suicide ला कायदेशीर मान्यता देणारा नेदरलँड (हॉलंड) हा पहिला देश ठरला. जर्मनीमध्ये कोणाच्याही मदतीशिवाय औषधे (Lethal Drug) घेऊन जीवन संपविण्यास कायदेशीर मान्यता देण्यात आली. दक्षिण कोरिया या देशात उपचार उपलब्ध नसलेल्या दुर्धर आजाराने ग्रस्त रुग्ण फक्त जीवंत ठेवणारी वैद्यकीय यंत्रणा वापरण्यास नकार देऊ शकतात. अमेरिकेमध्ये इच्छामरण बेकायदेशीर आहे. परंतु 6 राज्यांमध्ये (वांशिग्टन, डी. सी. वांशिग्टन, ओरेगॉन, कॅलिफोर्निया, कोलरॅडो, वरमाँट) वैद्यकीय तज्ज्ञाच्या देखरेखीखाली Assisted Sucide ला परवानगी आहे. युनायटेड किंगडम, न्यूझीलंड, फिलिपीन्समध्ये इच्छामरण बेकायदेशीर आहे. बेल्जियममध्ये दुर्धर आजाराने ग्रस्त बालकांना इच्छामरणाचा अधिकार आहे. (पालकांच्या व वैद्यकीय तज्ज्ञांच्या पूर्वपरवानगीने). Active Euthansia कायदेशीर असणारे हॉलंड व बेल्जियम हे दोन देश आहेत. तर स्विझर्लंडमध्ये शेवटच्या टप्प्यातील कर्करोग (Advanced Malignacy) वा ज्यावर उपचार उपलब्ध नाहीत अशा वेदना होत असल्यास इच्छामरणाचा अधिकार आहे.

सर्वोच न्यायालयाच्या पाच सदस्यीय खंडपीठाने 9 मार्च 2018 रोजी इच्छामरणास सशर्त परवानगी देण्याचा ऐतिहासिक निर्णय दिला. सरन्यायाधीश दिपक मिश्रा यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने (न्या. अजय खानविलकर, न्या. चंद्रचूड, न्या. ए. के. सिक्री व न्या. अशोक भूषण) याविषयीची काही मार्गदर्शक तत्वे अटींसह आखून दिली आहेत. 2005 मध्ये 'कॉमन कॉज' या स्वयंसेवी संस्थेने प्रतिष्ठेसह प्राण सोडण्याच्या अधिकाराबाबत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. प्रशांत भूषण यांनी सर्वोच्च न्यायालयात या स्वयंसेवी संस्थेची बाजू मांडली. या प्रकरणाचा निकाल देताना सरन्यायाधीश दिपक मिश्रा व न्या. खानविलकर यांनी एकत्रित व उर्वरित तीन न्यायाधीशांनी स्वतंत्रपणे निकालपत्र जाहीर केले. निकालामागची भूमिका न्यायाधीशांनी स्वतंत्रपणे नमूद केली असली तरी स्वेच्छामरणाचा अधिकार नागरिकांना सशर्त मिळावा याबाबत त्यांच्यामध्ये एकमत होते. सरन्यायधीश दिपक मिश्रा व न्या. खानविलकर यांच्या मते, जर व्यक्तीला दुर्धर आजाराला व वेदनेला सामोरे जावे लागत असेल तर तिचे जगणे हे केवळ वैद्यकीय मदतीवर अवलंबून आहे, ते प्रतिष्ठेचे जगणे नाही. व्यक्तीला प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार बहाल केला आहे. व्यक्तीचे मरण देखील प्रतिष्ठेचे असले पाहिजे. दुर्धर आजाराने ग्रस्त व्यक्ती जिच्यामध्ये सुधारणा होण्याची कोणतीही शक्यता नाही अशा व्यक्तीचा वेदना सहन करण्याचा कालावधी कमी करणे म्हणजेच तिला प्रतिष्ठेसह जगणे बहाल करणे होय. जेव्हा एखाद्या व्यक्तीचा श्वास फक्त वैद्यकीय मदतीने चालू असेल अन आपला श्वास चालू आहे याबाबत व्यक्ती अनभिज्ञ असेल याबाबत वैद्यकीय तज्ज्ञ व्यक्तीच्या कुटुंबाचे एकमत होईल तेव्हाच व्यक्तीची प्रतिष्ठा व्यक्तीपासून अलग होते. या निकालाने स्वेच्छामरणासंदर्भात (Passive Euthanasia) संदिग्धता दूर केली आहे. मरणासन्न व्यक्तीने मृत्यूला कोणत्या पध्दतीने सामोरे जावे हा त्या व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे. तसेच हा नैसर्गिक मानवी हक्क आहे. हा अधिकार बजविण्यासाठी व्यक्तीला कायदेमंडळाची आवश्यकता नाही (या निर्णयासह सर्वोच्च न्यायालयाने 2011 मधील सर्वोच्च न्यायालयाने स्वत: दिलेला निर्णय रद्द केला. 2011 मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या दोन सदस्यीय खंडपीठाने इच्छामरण (Passive Euthanasia) फक्त कायदेमंडळाने निश्चित केलेल्या प्रक्रियेने करता येईल, असा निर्णय दिला होता. (अरुणा शानबाग प्रकरण)

न्या. धनंजय चंद्रचूड यांनी असे मत व्यक्त केले की, व्यक्तीला प्रतिष्ठेचे मरण नाकारणे हे व्यक्तीला अर्थपूर्ण जीवन नाकारण्याप्रमाणेच आहे. अर्थपूर्ण जीवनामध्ये व्यक्तीचा स्वयंनिर्णयाचा अधिकार अंतर्भूत आहे. तसेच कोणते वैद्यकीय उपचार घ्यायचे या अधिकाराचा देखील त्यामध्ये समावेश होतो. वैद्यकीय शास्त्राने दीर्घकाळ जगण्याची इच्छा व जीवनाचा दर्जा यांचे संतुलन राखावे. या दोन्ही गोष्टी एकमेकांशिवाय अपूर्ण आहेत. जीवनाचे पावित्र्य म्हणजे अर्थपूर्ण जीवन जगणे होय. आनंद मिळविण्याची इच्छा या संकल्पनेत मुक्त इच्छेचा (Freewill) समावेश होतो आणि Free will मध्ये वैद्यकीय साहाय्य नाकारण्याचा अधिकार अंतर्भूत आहे. "Life and death are inseparable. To be is to die" न्या. अशोक भूषण यांच्या मते, प्रतिष्ठेने जागण्यामध्येच प्रतिष्ठापूर्वक मरण्याचा अधिकार समाविष्ट होतो. तसेच न्या. ए. के. सिक्री यांच्या मते, जगण्याच्या अधिकारात मृत्यूचा अधिकार समाविष्ट होतो की नाही याबाबत जरी धर्म, नैतिकता, तत्वज्ञान, कायदे आणि समाज यांच्यामध्ये मतभेद असले तरी त्या सर्वांचे प्रतिष्ठापूर्वक मरणाबाबत एकमत आहे. सर्वोच्च न्यायालयाने अरुणा शानबाग प्रकरणात Active Euthanasia ची व्याख्या "Entails the use of lethal substances or forces to kill a person e. g. a lethal injection" अशी केली आहे. तर 9 मार्च 2018 रोजी सर्वोच्च न्यायालयाने निकाल देताना Active Euthanasia ची व्याख्या "A Positive act or affirmative action or act of commission entailing the use of lethal substances of person by direct intervention" अशी केली आहे. तसेच व्यक्तीला फक्त जीवंत ठेवणारी साहाय्यक वैद्यकीय यंत्रणा काढून ठेवणे (Entails Withholding of medical treatment for continuance of life) या शब्दात सर्वोच्च न्यायालयाने Passive Euthanasia ची व्याख्या केली आहे, अर्थात रुग्ण फक्त व्हेंटिलेटर, औषध वा वैद्यकीय तज्ज्ञांच्या देखरेखीतील अन्न यावरच अवलंबून असेल तर ते देणे बंद करणे होय.

**इच्छामरण समर्थनार्थ बाजू :**

मानवी हक्काच्या दृष्टिकोनातून व्यक्तीला ज्याप्रमाणे जीवन जगण्याचा अधिकार देण्यात आला आहे त्याप्रमाणेच त्यास स्वच्छेने मरण्याचा अधिकार सुध्दा देण्यात यावा अशी मागणी मोठ्या प्रमाणात होत आहे. कारण जगण्याप्रमाणे मरणे देखील मानवाचा हक्क असला पाहिजे

असा मतप्रवाह तयार झालेला आहे. या मताचा उल्लेख सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठापैकी एका न्यायाधीशांनी केला आहे. त्यांनी मुद्याच्या समर्थनार्थ एपिक्युरस वाक्य उद्‌धृत केले आहे - "I do not fear death. Death is nothing to us since when we are death has not come and when death has come we are not" जगणे आणि मरणे एकमेकांपासून विभक्त करता येत नाही. आपण जीवंत आहोत याचाच अर्थ आपण क्षणाक्षणाने मृत्यूकडे जात आहोत. हा मार्ग प्रतिष्ठापूर्वक जगण्याइतकाच महत्त्वाचा आहे. म्हणजेच To be is to die होय. संविधानाने सर्वांना जगण्याचा व प्रतिष्ठापूर्वक जगण्याचा अधिकार दिला आहे, परंतु जेव्हा एखाद्या व्यक्तीस वेदना होत असतील तर व्यक्ती म्हणून तिची प्रतिष्ठा शाबूत आहे का? हा प्रमुख प्रश्न आहे. म्हणून वेदनेने त्रासलेल्या व्यक्तीस इच्छामरणाचा अधिकार देण्यात यावा. एखादी व्यक्ती असाध्य अशा रोगाने ग्रासलेली असेल आणि त्यामुळे त्या व्यक्तीस मरणासन्न यातना भोगाव्या लागत असतील तर अशा व्यक्तीला मानवी दृष्टिकोनातून इच्छामरणाचा अधिकार देण्यात यावा. त्या व्यक्तीस जगण्याची वेदना ही त्रासदायक ठरत असेल तर अशा व्यक्तीस इच्छामरण देण्यात यावे, जेणेकरुन प्रतिष्ठापूर्वक जगण्याप्रमाणेच तिचे मरणदेखील प्रतिष्ठापूर्वक असावे.

एखाद्या व्यक्तीची आर्थिक परिस्थिती अतिशय नाजूक असेल आणि त्यामध्येच त्यास असाध्य अशा रोगाने ग्रासल्यामुळे अशा व्यक्तीची जिवंत राहण्याची शक्यता खूप कमी असेल तर अशा व्यक्तीस इच्छामरणाचा अधिकार देण्यात यावा. अशा व्यक्तीस आर्थिक संसाधनाअभावी व उपचारात्मक औषध उपलब्ध नसल्यास प्रतिष्ठापूर्वक मरण स्वीकारण्याचा पर्याय उपलब्ध करुन द्यावा. वयाच्या 70 वर्षानंतर काही व्यक्तींना परावलंबी जीवन जगावे लागते. तसेच आर्थिकदृष्ट्या हलाखीची परिस्थिती असणाऱ्या कुटुंबांना अशा व्यक्तींवर खर्च करणे शक्य होत नाही किंवा केला जात नाही. त्यामुळे अशी व्यक्ती खूप हलाखीच्या व कठीण परिस्थितीत जीवन व्यतीत करत असते आणि त्यामध्ये त्यांना त्यांचे शरीर साथ देत नसते. व्यक्तीचे जीवन हे प्रतिष्ठापूर्वक जीवन असावे याविषयी संविधान आग्रही आहे. उदा. मुंबईच्या उपनगरातील लवाटे दाम्पत्यांनी आपण यापुढे फक्त समाजाच्या संसाधनावरचा भार आहे, यापुढे आम्ही शारीरिक वार्धक्यामुळे समाजाला योगदान देऊ शकत नाही. परिणामी आम्हास इच्छामरण स्वीकारण्याची परवानगी द्यावी, असे पत्र राष्ट्रपतींना दिले आहे. एखादी व्यक्ती जर कोमात किंवा कोमाजन्य अवस्थेत

असेल तसेच त्या व्यक्तीची भविष्यात ठिक होण्याची शक्यता नसेल तर अशा व्यक्तीस दयामरणाचा मार्ग खुला करुन द्यावा.

**इच्छामरण : असमर्थनार्थ बाजू :**

एखाद्या व्यक्तीला मरण्याचा अधिकार देणे म्हणजे ती अमानवीय कृती समजली जात आहे. कारण समाजात अजुनही मोठ्या प्रमाणात इच्छामरणाकडे एका अधिकाराच्या स्वरुपात पाहिले जात नाही. भारतात इच्छामरणाकडे तार्कीक दृष्टीने न पाहता भावनिकदृष्ट्या पाहिले जाते. व्यक्तीचे आपल्यासोबत असणे, कुटुंबव्यवस्थेची रचना, त्यामधून आकारास येणारी मानसिकता यामुळे इच्छामरणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन नकारात्मक आहे. आपल्या समाजामध्ये भावनांना खूप महत्त्व आहे. त्यामुळे इच्छामरण देणे म्हणजे एकप्रकारे पाप किंवा अनैसर्गिक कृती समजली जाते. यामुळे इच्छामरणास मोठ्या प्रमाणात विरोध होत आहे. इच्छामरणासंबंधी कायदा तयार केला तर याचा मोठा प्रमाणात दुरुपयोग केला जाऊ शकतो. यामुळे या कायद्यास विरोध करणारा मोठा वर्ग दिसत आहे. भारतीय समाजमन इच्छामरणासाठी पूर्णपणे तयार आहे, असे म्हणता येत नाही. एकत्र कुटुंबपध्दतीचा ऱ्हास, विभक्त कुटुंबाचे वाढते प्रमाण, कुटुंबातील जेष्ठाकडे पाहण्याचा दृष्टिकोन यामुळे इच्छामरणाच्या कायद्याचा दुरुपयोग होण्याची शक्यता आहे. मालमत्ता, पैसा याचा वाद यामुळे देखील कुटुंबामध्ये या अधिकाराचा गैरवापर होऊ शकतो. उदा. आर्थिकदृष्ट्या भार समजल्या जाणाऱ्या वृध्दांना घरातीलच व्यक्तीकडून मारण्याची थलाईकुथल पध्दत तामिळनाडूच्या काही भागात वापरली जाते. या परंपरेनुसार 26 विविध प्रकारे घरातील व्यक्ती वृध्द व्यक्तीस मारते. याला Geronticide व Involuntary Euthanasia म्हटले जाते. जर इच्छामरणाचा अधिकार दिला तर त्याचा याच पध्दतीने गैरवापर होण्याची शक्यता आहे. इच्छामरणासंबंधी कायदा तयार करणे म्हणजे एखाद्या व्यक्तीचा जगण्याचा हक्क हिरावून घेतल्यासारखे आहे. समाजामधील काही गट आत्महत्या व इच्छामरण यात फरक करत नाही. त्यामुळे इच्छामरण म्हणजे आत्महत्या करण्यासारखे आहे. त्यामुळेही इच्छामरणास विरोध होत आहे. इच्छामरण व आत्महत्या या वेगवेगळ्या संकल्पना आहेत. या दोन्ही संकल्पनांमधील फरक समजण्याइतका समाज प्रगल्भ आहे याबाबत सांशकता आहे. त्यामुळे इच्छामरणाचा अधिकार बहाल करण्यास विरोध होत आहे.

**निष्कर्ष (Conclusion) :**

मानवी हक्काच्या दृष्टिकोनातून विचार करता इच्छामरण ही व्यक्तीच्या जीवनासंदर्भातील अत्यंत महत्त्वपूर्ण बाब आहे. परंतु ती एक गुंतागुंतीची संकल्पना राहिली आहे. तिला कायद्याच्या चौकटीत बसवणे अवघड आहे. कारण या संकल्पनेला कायद्याच्या चौकटीत बसवताना कायदा व नैतिकता समोरासमोर उभ्या ठाकतात. कायदा ही किमान नैतिकता आहे, जी सर्व नागरिकांनी पाळणे अपेक्षित आहे. इच्छामरण व आत्महत्येमधील फरक समजून घेणे आवश्यक आहे. या दोहोंमधील सीमारेषा खूप धुसर आहे. आपल्या अवस्थेबद्दल अनभिज्ञ असणाऱ्या व्यक्तीबद्दल जर त्यांचे कुटुंबीय नातेवाईक निर्णय घेऊ शकतात, तर मग स्वत:चे बरेवाईट समजणारी, आत्महत्येचा परिणाम समजणारी व्यक्ती भारतात आत्महत्या करु शकत नाही. म्हणजे भारतात आत्महत्या करणे बेकायदेशीर आहे. भारतीय दंड संहिता 1860 नुसार (कलम-309) आत्महत्येचा प्रयत्न करणे हा गुन्हा आहे. हे कलम रद्द करण्यात यावे अशी शिफारस 1967 मध्ये पहिल्यांदा विधी आयोगाद्वारा करण्यात आली. 1985 मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने मारुती डुबल विरुध्द महाराष्ट्र राज्य खटल्याचा निकाल देताना नमुद केले की, भारतीय संविधानातील कलम-21 जीवन जगण्याचा अधिकार (Right to life) मध्ये मरण्याचा अधिकार (Right not to live or right to end one's life) समाविष्ट होतो व कलम-309 असंवैधानिक ठरविले, परंतु 1986 मध्ये आंध्रप्रदेश उच्च न्यायालयाने कलम-309 संवैधानिक ठरविले होते.

सर्वोच्च न्यायालयाने 1994 मध्ये पी. रथीनाम विरुध्द भारतीय संघराज्य खटल्याचा निकाल देताना नमुद केले की, "आत्महत्या हा मानसिक असंतुलनाचा परिपाक आहे. त्याचा गुन्हेगारी हेतूशी संबंध नाही. शिवाय कलम-209 हे जीवनाच्या अधिकाराशी विसंगत आहे. त्यामुळे ते असंवैधानिक ठरते. " परंतु सर्वोच्च न्यायालयाची ही भूमिका जास्त काळ टिकली नाही. एखाद्या व्यक्तीला आत्महत्येस प्रवृत्त करणे हा गुन्हा आहे. (IPC कलम-306 - 10 वर्षे शिक्षा), परंतु त्याला आत्महत्येस प्रवृत्त करणे म्हणजे त्याला त्याचा मूलभूत अधिकार बजावण्यास मदत करणे, अशी भूमिका वकिलाने घेतली. परिणामी 1996 मधील गियान कौर प्रकरणाचा निकाला देताना सर्वोच्च न्यायालयाने नमुद केले की, 'आत्महत्या म्हणजे अनैसर्गिकपणे जीवन

संपविणे होय. तो कलम-21 चा भाग असू शकत नाही' यावेळी सर्वोच्च न्यायालयाने कायद्याची इष्टता (Desirability of law) व कायद्याची संवैधानिकता (Constitutinality of law) यामधील फरक स्पष्ट केला व कलम-306 संवैधानिक ठरविले. या निर्णयामुळे कायद्याची चौकटीत इच्छामरणाची संकल्पना बसवण्याची सुरुवात झाली. जीवनाच्या अधिकारात मरण्याचा अधिकार समाविष्ट होत नसून प्रतिष्ठेने मरण्याचा अधिकार समाविष्ट होतो. प्रतिष्ठेसह मरणे म्हणजे अनैसर्गिक मृत्यू नव्हे. जेव्हा व्यक्ती एखाद्या दुर्धरआजाराने ग्रस्त आहे, तिचे मरण अटळ आहे, तेव्हा तिला इच्छामरणाचा अधिकार देणे योग्य आहे. परंतु Active Euthansia च्या तुलनेत Passive Euthanasia ला मान्यता देणे नैतिकदृष्ट्या योग्य की अयोग्य हा देखील मुद्दा महत्त्वाचा आहे. कारण फक्त औषधे अन्नाचा पुरवठा बंद करुन रुग्णाला हळूहळू मरु देणे (Passive Euthanasia) हा थेट इंजेक्शन (Painless) देण्यापेक्षा (Active Euthansia) जास्त क्रूर मार्ग आहे. तसेच Active व Passive Euthansia मधील फरक हा मारणे (Killing) व मरण्यास परवानगी देणे (Allowing to Die) इतकाच आहे. फक्त Active Euthansia चा गैरवापर होण्याची शक्यता खूप मोठी आहे. त्यामुळे कदाचित Active Euthansia ला न्यायालयाने परवानगी दिली नाही. सर्वोच्च न्यायालयाने आखून दिलेली मार्गदर्शक तत्वे पाहता डॉक्टर व वैद्यकीय मंडळाची भूमिका महत्त्वाची आहे. या प्रक्रियेचे योग्य पध्दतीने पालन झाल्यास इच्छामरणाच्या अधिकाराचा दुरुपयोग होण्याची शक्यता कमी आहे. वैद्यकीय तज्ज्ञ आज सुध्दा नातेवाईकांना व रुग्णास विश्वासात घेऊन Passive Euthansia चा वापर करतात. रुग्णाची मरणासन्न स्थिती, त्याला होणाऱ्या वेदना, उपचार उपलब्ध नसणे, उपलब्ध उपचार आवाक्यात नसणे यामुळे इच्छामरणास परवानगी द्यावी, अशी मागणी होत होती. सर्वोच्च न्यायालयाने 9 मार्च 2018 रोजी तशी परवानगी सशर्त दिल्याचे स्वागत करावयास हवे; कारण मानवी हक्काच्या योग्य उपलब्धीकरिता व्यक्तीला प्राप्त झालेला इच्छामरणाचा अधिकार अतिशय सकारात्मक ठरणार आहे.

**संदर्भग्रंथ सूची (Bibliography) :**

Gupta, U. N. (2006). Human Rights. New Delhi : Atlantic Publishers & Distributors.

Grover, Virender (1997). *The Constitution of India.* New Delhi : Deep & Deep Publications.

Sachar, Rajinder (2004). *Human Rights (Perspectives & Challenges).* New Delhi : Gyan Publishing House.

शर्मा, जी. एल. (2015). *सामाजिक मुद्दे.* जयपूर : रावत पब्लिकेशन्स.

राजकिशोर (संपादक) (2012). *मानव अधिकारो का संघर्ष.* नई दिल्ली : वाणी प्रकाशन.

शर्मा, सुभाष (2014). *भारत मे मानवाधिकार.* नई दिल्ली : राष्ट्रीय पुस्तक न्याय.

भसीन, अनिश (2015). *जानिए मानव अधिकारो को.* नई दिल्ली : ग्रंथ अकादमी.

https://www.britanica/com/topic/euthanasia

https://www.ncbi.nim.nih.gov/pmc431/376/

https://www.healthline.com/health/hat-is-euthanasia

https://www.britanica.com/topics/ethics-philosophy/Applied-thics#ref8858882

https://www.bbc.co.uk/ethics/euthanasia/overview/activepassive

https://www.hi.wikipedia.org/wiki/इच्छा-मृत्यू

https://www.hindilibraryindia.com/essay/इच्छा-मृत्यू-का-अधिकार-पर/21882

https://www.dspace.capital/vduvs.edu.ua/handle/1234567890/11

https://www.ncbi.n/m.gov/pmc/articles/PMC3440914